N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नांदेड P.S. (पोलीस ठाणे): कंधार Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0323 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/08/2026 14:53 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): बुधवार Date from (दिनांक पासून): 05/08/2026 Date To (दिनांक पर्यंत): 05/08/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५ Time From (वेळेपासून): 14:04 तास Time To (वेळेपर्यंत): 14:32 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 22/08/2026 Time (वेळ): 14:38 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 018 Date and Time (दिनांक आणि वेळ): 22/08/2026 14:38 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 0.5 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): नंदनवन तलाठी कार्यालय, ,कंधार

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): अर्चना वैजनाथ करपुडे

(b) Father's Name (चे नाव ): वैजनाथ

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि नांदेड , नांदेड , भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि नांदेड , नांदेड , भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-8087343862

Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | पालसाहेब आनंदराव मुंडे | | वडील चे नाव : आनंदराव मुंडे | 1. Town/Village (शहर / गाव): सज्जा नंदनवन ता कंधार,Tehsil (तहसील): कंधार,Police Station (पोलीस ठाणे): कंधार,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच मागणी रक्कम 12000 रू | 12,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक 22/08/2026

मी अर्चना वैजनाथ करपुडे, वय 39 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8087343862सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील एक वर्ष पासुन पोलीस निरीक्षक म्हणून

कार्यरत आहे. आम्ही दिनांक 04/08/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री राहुल तरकसे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार बाबुराव मारोती कौशल्य, वय 30, व्यवसाय सामजिक कार्यकर्ता व शेती रा.चिंचोली ता.कंधार जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

त्यावरून आम्ही तक्रारदार बाबुराव मारोती कौशल्य यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, माझी मौ.जे नंदनवन ता.कंधार जि.नांदेड येथे गट क्रमांक 336 मध्ये 0.55 आर शेत जमीन ही वडीलोपार्जित आहे. ती जमीन माझी आई श्रीमती गिरजाबाई मारोती कौशल्य यांच्या नावावर आहे. सदरील शेत जमीन माझे नावावर करण्यासाठी माझा मोठा भाऊ बळवंत मारोती कौशल्य व माझी आई गिरजाबाई कौषल्य यांचे 100/- रू बाॅन्ड वर संमतीपत्र तयार करून घेवून मी दिनांक 03/08/2026 रोजी तलाठी सज्जा कार्यालय नंदनवन येथील तलाठी श्री मुंडे यांच्याकडे गेलो व त्यांना भेटून माझाकडे असलेले 100/- रू चा बाॅन्ड वरील समंतीपत्र , आईचे व माझे आधार कार्ड, सातबारा उतारा, असे मुळ कागदपत्र त्यांच्याकडे दिले. माझे नावावर फेरफार लावण्यासाठी विंनती केली असता त्यांनी मला सांगितले की, सदर शेत जमीनीची फेरफार लावण्यासाठी मला तुम्ही 12000/- रू दयावे लागतील असे सांगितले. त्यावर मी तलाठी मुंडे साहेबांना विंनती केली की 12000/- रू खुप जास्त होतात. काही कमी जास्त करा तेव्हा त्यांनी म्हणाले की यात काही कमी जास्त होत नाही मी आधीच तुम्हाला कमी सांगितले आहेत. असे बोलून मला दिनाक 05/08/2026 रोजी पैसे घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना नाईलाजस्तव होकार दिला. तलाठी मुंडे साहेब हि मागत असलेले 12,000/- रुपये लाच असल्याचे मला माहीत आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझा व त्यांचा पैसे देण्या घेण्याचा अर्थिक व्यवहार नाही, त्यांची व माझी पुर्व दुश्मनी नाही. तरी तलाठी मुंडे साहेब यांना दिनांक 05/08/2026 रोजी कंधार येथे मी भेट घेण्यासाठी जाणार असुन त्यावेळी त्यांनी माझ्याकडे वर नमुद कामाकरीता लाचेची मागणी करुन स्वतः किंवा इतरांमार्फत लाच स्विकारल्यास त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी वगैरे मजकुराचा तक्रारी अर्ज दिला. त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना गोपनियता राखण्याची सुचना देवून त्यांच्या घरी जाण्याची परवानगी दिली व उदईक दिनांक 05/08/2026 रोजी कंधार येथे आम्ही सापळा पथक येणार असल्याची सांगून त्यांना हजर राहण्याची सुचना केली.

त्यांनतर पुढील गोपनिय कामाकरीता प्रादेशिक परिवाहन कार्यालय नांदेड येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले व त्यांना दिनांक 05/08/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता ला.प्र.वि कार्यालय येथे हजर राहण्याची सुचना केली.

दिनांक 05/08/2026 रोजी संकाळी 10.00 दोन्ही पंच ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथे हजर आले. त्यांनतर सापळा कार्यवाहीत अंमलदार मपोॅहेकाॅ/मेनका पवार, चापोहेकाॅ/गजानन राउत पोका ॅ/सय्यद खदीर, पोकाॅ/शिवानंन रापतवार असे सापळा कार्यवाही करीता लागणारे सर्व साहित्य घेवून शासकीय वाहनाने कंधार येथे रवाना होवून तेथे पोहचून सुरक्षीत ठिकाणी थांबलोत. त्यानंतर तक्रारदार हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी हजर आले. त्यानंतर तक्रारदार कौशल्य यांना सर्व सापळा पथक व दोन्ही पंच यांची एकमेकाशी ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची



लोकसेवक
कौशल्य यांच
असल्याची म

लोकसेवक यांच्या विरूध्दची तक्रार दोन्ही पंचास तोंडी सांगीतली त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार कौशल्य यांनी दिनांक 04/08/2026 रोजी दिलेली तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री करून त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व आमचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार कौशल्य व पंच क्रमाक 1. शेख जाकीर यांना लोकसेवक तलाठी मुंडे यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणापासुन 14.04 वाजता तलाठी कार्यालय कंधार येथे रवाना केले.

त्यानंतर 14.32 वाजताचे सुमारास तक्रारदार कौशल्य व पंच क्र. 1 जाकीर शेख हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांच्या गळयातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार कौशल्य व पंच क्र. 1 जाकीर शेख यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 जाकीर शेख यांनी सांगीतले की, आम्ही दोघे तहसील कार्यालय कंधार येथे गेलो. लोकसेवक तलाठी मुंडे साहेब हे दिसत नसल्याने तक्रारदार यांनी तलाठी मुंडे साहेब यांना कॉल करून कुठे आहेत असे विचारले तेव्हा तलाठी मुंडे यांनी सांगितले मी कंधार मध्ये तहसील कार्यालय येथे आहे या येथे असे कळविले त्यानंतर आम्ही व तक्रारदार हे तहसील कार्यालय कंधार येथे गेलो असता त्या ठिकाणी तलाठी मुंडे साहेब यांची भेट झाली. तेव्हा तक्रारदार यांनी तलाठी मुंडे यांना म्हणाले की " पाटलांन फोन केलते, प्रदिप पाटलानं, आपल्या हयाला किती दिवस लागेल, प्रोसेस व्हायला " तेव्हा तलाठी मुंडे म्हणाले की, " वीस पंचवीस दिवस लागतील " तेव्हा तक्रारदार कौषल्य म्हणाले की वीस-पंचवीस दिवस लागल ? सर थोड अमाऊंन्ट मधी हे करा कि सर ,,, ज्वारी घेवून आलतो मी, जरा पैसे कमी यायलेत, काही अँडजसमेंन्ट करा सर, " दोन हजार रूपये कमी घ्या " तेव्हा लोकसेवक तलाठी मुंडे म्हणाले नाही,,, नाही तेव्हा तक्रारदार म्हणाले " दुस-या कोणत्या तरी कामा मधी काही करूता म्हणायलो " तेव्हा तलाठी मुंडे म्हणाले " तस नसते जमत हो " तेव्हा तक्रारदार म्हणाले .......घरचे जरा गर्दा करायलेत, लयी व्हायलेत, अ.....आई म्हणाली येवढे पैसे असतात काय ? तेव्हा तलाठी मुंडे म्हणाले की ................ राहु दया त्याच्यात काय, नका देवु ना, राहु दया ना तसंच काय व्हायलय,,,,,, "मग करू नका,,,,,,, " तक्रारदार.....मग बघा की " सर थोड ते सात आठ हजार रूपयाची जौड झालती " तलाठी मुढे नाही,,, नाही तक्रारदार,,, जावून येतो मग तेव्हा तलाठी मुंडे,,,,, बघा तुम्हची इच्छा ,,,, तक्रारदार ,,,मग काही कमी तेव्हा तलाठी मुंडे,,, नाही ,,,, " तक्रारदार तेवढयाला तेवढेच दयाचे बाराला बारा " तेव्हा तलाठी मुंडे म्हणाले .....हो,,,, असे बोलून पैसे स्विकारण्याची संमती दिली. तेव्हा आम्ही व तक्रारदार असे दोघे मिळून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर तक्रारदार कौशल्य यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितल्या प्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक मुंडे यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. लाचमागणी पडताळणीत लोकसेवक तलाठी मुंडे यांनी तक्रारदार कौशल्य यांना त्यांचे वडिलोपार्जित शेत जमीन त्यांच्या नावावर फेरफार लावण्यासाठी 12000/- रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार कौशल्य यांनी सांगितले की माझ्या आईची तब्येत

ठिक नाही त्यामुळे मला घरी जाणे आवश्यक आहे आज रोजीची कारवाई तात्पुती स्थगित करावी अशी आम्हास विंनती केली. त्यामुळे आम्ही सर्वानुमते आज रोजीची कारवाई तात्पुर्ती स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर आम्ही तक्रारदाराचे संपर्कात राहून लाच स्वीकृती सापळा आजमिवण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी कळविले की, माझ्या आईला पॅरालीसीस आहे. त्यामुळे त्यांची तब्यत ठिक नसल्यामुळे थोडे दिवस थांबण्याची विंनती केली त्यामुळे दरम्यानच्या काळात सापळा कार्यवाही करता आलेली नाही.

त्यांनतर दिनांक 14/08/2026 रोजी तक्रारदार यांना संपर्क साधून सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहित्य घेवून 13.50 वाजता कंधार येथे रवाना झालोत सर्व सापळा पथक व दोन पंच असे शासकीय वाहनाने कंधार येथे सुरक्षित ठिकाणी थांबलोत. त्यांनतर तक्रारदार यांना दिलेल्या सुचने प्रमाणे तो सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी हजर आले. दिनांक 05/08/2026 रोजी केलल्या लाचमागणी पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक तलाठी मुंडे यांनी तक्रारदार कौशल्य यांना त्यांचे वडिलो पार्जित शेत जमीन त्यांच्या नावावर फेरफार लावण्यासाठी 12000/- रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. या बाबतची सर्व सापळा पथक यांना उजळणी करून दिली व आज रोजी सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सापळा पथकातील सर्व सदस्य व तक्रारदार यांना सांगितले.

त्यांनतर तक्रारदार कौशल्य यांनी सापळा कार्यवाही करीता लागणारी त्यांच्या जवळील रक्कम 12000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या चोविस नोटा पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने पोकाॅ/खदीर यांना दिलेल्या सुचना प्रमाणे त्यांनी तक्रारदार व दोन्ही पंचास अॅन्थ्रासिन पावडरचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. व लाच रक्कम 12000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 24 नोटा यास अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार कौशल्य यांचे पॅटच्या उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पोहेकाॅ/दाबनवाड यांना डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करुन देण्याची सुचना दिली. त्यानंतर सर्व सापळा पथक यांना सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सविस्तर सुचना दिल्या. पोहेकाॅ/दाबनवाड यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर 16.09 वाजता चालु करुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना लोकसेवक तलाठी मुंडे यांचे कंधार येथील कार्यालयात तलाठी मुंडे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्याकडे रवाना केले. सर्व सापळा पथक शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ तलाठी मुंडे यांच्या कार्यालयाच्या बाहेर सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. तेव्हा तक्रारदार यांनी आमचे सुचने प्रमाणे सर्व सापळा पथक आजुबाजुला आल्याची खात्री करुन तलाठी कार्यालयात जावून लगेच ईशारा न करता परत आले. तक्रारदार हे सापळा पथका जवळ सुरक्षित ठिकाणी आल्यानंतर तक्रारदार यांच्या गळयातील व्हाईस रेकाॅर्डर 16.39 वाजता बंद करून ताब्यात घेतले.

त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, तक्रारदार व आम्ही तलाठी मुंडे यांच्या कार्यालयात येथे गेलो असता त्या ठिकाणी त्यांच्या कार्यालयात मुंडे तलाठी हे हजर नव्हते म्हणुन तक्रारदार यांनी त्या ठिकाणी हजर असलेले इतर लोकसेवक यांना विचारणा केली की, मुंडे साहेब आहेत का, तेव्हा त्यांनी सांगितले मुंडे साहेब नाहीत. त्यानंतर आम्ही कार्यालयाचे बाहेर जावून तक्रारदार यांनी तलाठी मुंडे यांना स्पिकर ऑन करून काॅल केला असता त्यांचा मोबाईल

स्विच ऑफ आहे असे कळविले. त्यानंतर आम्ही दोघे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.

त्यानंतर तक्रारदार यांना विचारणा केली, तेव्हा त्यांनी वरील प्रमाणे हकीकत कथन केले. त्यामुळे लोकसेवक तलाठी मुंडे यांच्याषी संपर्क झाला नाही व त्यांची भेट झाली नसल्यामुळे आज रोजीची कार्यवाही स्थगित करण्यात आली.

दिनाक 17/08/2026 रोजी तक्रारदार यांना संपर्क साधून सापळा कारवाई साठी लागणारे सर्व साहित्य घेवून 14.50 वाजता कंधार येथे रवाना झालोत सर्व सापळा पथक व दोन पंच असे शासकीय वाहनाने कंधार येथे सुरक्षित ठिकाणी थांबलोत. त्यानंतर तक्रारदार यांना दिलेल्या सुचने प्रमाणे तो सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्रमांक 1 असे दोघांना लोकसेवक मुंडे यांची भेट घेणे करीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.16 वाजता चालु करून कंधार येथील

कार्यालयात भेट घेण्यासाठी अँथ्रासिन पावडरयुक्त नोटासह त्यांच्याकडे रवाना केले. सर्व सापळा पथक शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ तलाठी मुंडे यांच्या कार्यालयाच्या बाहेर सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. तेव्हा तक्रारदार यांनी आमचे सुचने प्रमाणे सर्व सापळा पथक आजुबाजुला आल्याची खात्री करून तलाठी कार्यालयात जावून लगेच ईशारा न करता परत आले. तक्रारदार हे सापळा पथका जवळ सुरक्षित ठिकाणी आल्यानंतर तक्रारदार यांच्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर 16.31 वाजता बंद करून ताब्यात घेतले. पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांना काय घडले आहे याबाबत विचारणा केली, तेव्हा त्यांनी कळविले की, तक्रारदार व आम्ही तलाठी मुंडे यांच्या कार्यालया जवळ गेलो असता त्या ठिकाणी ते हजर नव्हते, म्हणुन तक्रारदार यांनी तेथे हजर असलेले तलाठी यांना विचारणा केली, मुंडे साहेब कुठे आहेत ? तेव्हा त्यांनी सांगितले मुंडे साहेब नाहीत. त्यानंतर आम्ही कार्यालयाचे बाहेर जावून तलाठी मुंडे यांना स्पिकर ऑन करून कॉल केला असता त्यांचा मोबाईल बंद असल्याने संपर्क झालेला नाही. त्यानंतर आम्ही दोघे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.त्यानंतर तक्रारदार कौशल्य यांना आम्ही सुचना दिल्या की, परत लोकसेवक मुंडे यांचा तुम्हाला कॉल आला तर आम्हाच्याशी संपर्क करा, परंतु आज रोजी पर्यत तक्रारदार यांचा आम्हाला सदर बाबत फोन आला नाही. त्यामुळे आम्ही दिनांक 22/08/2026 रोजी कंधार येथे पंचासमक्ष हजर येवून तक्रारदार यांना फोनद्वारे संपर्क करून त्यांची समक्ष भेट घेवून विचारणा केली की, तलाठी मूंडे यांचा फोन आला होता का ? त्यावर तक्रारदार कौशल्य यांनी आम्हाला पंचासमक्ष सांगितले की, तलाठी मुंडे यांना माझ्यावर काहीतरी संशय आला आहे. त्यामुळे तलाठी मुंडे साहेब हे कार्यालयात येत नाही. तसेच फोन बंद करून ठेवलेला आहे. ते लाचेची रक्कम आता माझेकडून स्विकारणार नाहीत. त्यामुळे आपण पुढील योग्य ती कारवाई करावी असे सांगितले. एकंदरीत तलाठी पालसाहेब आनंदराव मुंडे यांना संपर्क केला असता. त्यांचा फोन बंद येत आहे तसेच ते तक्रारदाराशी संपर्क करत नाहीत. यावरून त्यांना तक्रारदारावर संशय आल्याने ते लाचेची रक्कम तक्रारदाराकडून स्वीकारणार नाही अशी तक्रारदार यांची खात्री झाली आहे. त्यामुळे सदर सापळा कार्यवाहीतील लोकसेवक पालसाहेब आनंदराव मुंडे, पद: तलाठी, नेमणूक सज्जा नंदनवन, ता.कंधार, जि.नांदेड यांनी तक्रारदार बाबूराव कौशल्ये यांचे मौजे नंदनवन ता.कंधार जि.नांदेड येथे गट क्रमांक 336 मधील वडीलोपार्जित शेत जमीनीची फेरफार तक्रारदार यांच्या नावे लावण्यासाठी तलाठी पालसाहेब

मुंडे यांनी 12000/- रूपये लाचेची मागणी करून स्वतः स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून माझी वरील आरोपी लोकसेवक यांच्या विरूध्द कलम 7 भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे. फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Arvind Nivrutti Ghodke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Arvind Nivrutti Ghodke

14.

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** REVANGM8001